फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१२३/२०२१ मधील निशाणी क्र.५ वरील आदेश

**(CNR NO.MHPU170028352021).**

शुभांगी उर्फ किर्ती धुमाळ वि. समीर उर्फ रवि धुमाळ वगैरे.

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज, महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ नुसार गैरअर्जदार क्र.१ याचेकडून तिचे उदरनिर्वाहासाठी दरमहा रक्कम रु.१५,०००/– अंतरिम पोटगी मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथने व अर्जदार यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद असा की, अर्जदार हिचे लग्न गैरअर्जदार क्र.१ याचेसोबत दिनांक २९.१२.२०१८ रोजी झाले. इतर गैरअर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ चे नातेवाईक आहेत. लग्नानंतर, अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेल्यानंतर, गैरअर्जदार क्र.१ हा शरीर संबंध ठेवण्यास असमर्थ असल्याचे अर्जदार हिच्या लक्षात आले. गैरअर्जदार क्र.१ याचेवर पुणे येथील डॉक्टर पाटणकर यांच्याकडे ६ महिने उपचार घेवुन देखील तो अर्जदार हिच्यासोबत शारिरीक संबंध ठेवु शकला नाही. गैरअर्जदार क्र.१ याने डिसेंबर २०२० मध्ये अर्जदार हिस अतोनात मारहाण केली तसेच अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेवुन तिला मानसिक त्रास दिला. जानेवारी २०२१ मध्ये गैरअर्जदार याने अर्जदार हिच्या अंगावरील सर्व सोन्याचे व चांदीचे दागिने व कपडे घेवुन तिला माहेरी हाकलुन दिले.

३. अर्जदार हिचे कथन की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. ती तिचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ असल्याने नातेवाईकांच्या दयेवर तिला

जगावे लागत आहे. याऊलट, गैरअर्जदार याचे कुटूंबियांकडे ४० एकर बागायत जमीन, ट्रॅक्टर, गाडी, प्रिमीयर, स्वीफट गाडी, चार मोटारसायकल, इ. वाहने आहेत. गैरअर्जदार क्र.१ हा रस्त्याची कामे घेणारा ठेकेदार आहे. गैरअर्जदार व त्यांचे कुटूंबिय दरसाल एक कोटी रुपये उत्पन्न मिळवितात. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे, म्हणुन गैरअर्जदार क्र.१ याच्याकडुन तिला दरमहा १५,०००/– प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याचा आदेश होण्याकामी तिने विनंती केली आहे.

४. गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.१२ वर दाखल केले असुन त्यांनी अर्जदार हिचा गैरअर्जदार क्र.१ सोबत दिनांक २९/१२/२०१८ रोजी विवाह झाला ही बाब मान्य केली असुन त्याव्यतिरीक्त अर्जदाराच्या अर्जातील उर्वरीत मजकुर चुकीचा व लबाडीचा असल्याचे कथन केले आहे. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा शारिरीक संबंध प्रस्थापित करण्यास असमर्थ असल्याबाबतचे अर्जदार हिचे कथन बिनबुडाचे व कागदोपत्री आधार नसताना खोटा आरोप केला आहे. त्यांचे कथन की, अर्जदार हिने घरातील कामे न करणे, ऊशिरा उठणे, घरातील लोकांना उलटे बोलणे, गैरअर्जदार यांचा अपमान करणे, त्यांना मारहाण करणे,इ. प्रकार चालु केले. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ यास शरीरसंबंध ठेवण्यास नकार दिला. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिचा कोणत्याही प्रकारे शारिरीक व मानसिक छळ केला नाही.

५. दिनांक ०१/१०/२०१९ रोजी गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिच्यासोबत पुणे येथील दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटल व रिसर्च सेंटर येथे जावुन तपासणी केली असता, तेथील डॉक्टरांनी गैरअर्जदार याचे सर्व रिपोर्ट नॉर्मल

असुन गैरअर्जदार हा शारिरीकदृष्टया तंदुरुस्त व नॉर्मल असल्याचे अर्जदार हिस सांगितले. दिनांक ०६/०१/२०२० रोजी गैरअर्जदार याने अर्जदार हिचे आई–वडील व नातेवाईकांस अर्जदार हिस समजावुन सांगण्यासाठी बोलावले असता, अर्जदार हिने गैरअर्जदारास शिवीगाळ केली व उलटे बोलली. तसेच ती गैरअर्जदारास म्हणाली की, तिचे इंदापूर येथील मुलाबरोबर प्रेमसंबंध असुन तिला त्याच्याबरोबर लग्न करायचे होते. परंतु आई–वडिलांच्या दबावामुळे तिने इच्छेविरुध्द लग्न केले. अर्जदार हिचे आई–वडिलांनी गैरअर्जदारापासुन खरी माहिती लपवुन ठेवली. दिनांक ०६/०१/२०२१ रोजी अर्जदार हिचे वडील व चुलते यांनी गैरअर्जदार घरात नसताना, कोणाला काहीही न सांगता अर्जदार हिस तिचे सर्व दागिने, कपडेलत्ता व पैश्यांसह घेवुन गेले. त्यानंतर, ब–याचवेळा अर्जदार हिस नांदावयास येण्यास सांगितले असता, तिने नकार दिला.

६. गैरअर्जदाराचे कथन की, त्याला शेतीशिवाय उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तो त्याच्या चुलता, चुलती, व चुलत भावांपासुन विभक्त रहात आहे. अर्जदार ही गैरअर्जदार याचेशी कधी पत्नी म्हणुन राहिली नाही. तिला गैरअर्जदार याच्याबरोबर संसार करण्याची इच्छा नाही. अर्जदार हिने कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय गैरअर्जदार याचा त्याग केला आहे. याऊलट गैरअर्जदार क्र.१ यास अर्जदार हिस नांदवण्याची इच्छा व तयारी आहे. अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.१ विरुध्द घटस्फोट मिळण्यासाठी बारामती येथील मे. न्यायालयात मॅ.पि. नं.५००/२०२१ अर्ज दाखल केला आहे. तसेच गैरअर्जदार याने अर्जदार ही नांदावयास यावी म्हणुन बारामती येथील मे. सि.ज.सि.डिव्ही. यांचे न्यायालयात मॅ.पि.६३९/२०२१ हा दाखल केलेला आहे.

७.        अर्जदार हिने यादी निशाणी क्र.३ सोबत तिच्या विवाहाच्या फोटोची, आधारकार्डाची, माहेरकडील रेशनकार्डाची, मंगल कार्यालयाचे भाडे भरल्याच्या पावतीची, दागिने खरेदी केलेल्या पावत्यांची व धुमाळवाडी येथील जमीन गट नं.१४९, २८, ५६ व ५७ च्या ७/१२ उता–याच्या छायांकित प्रती, इ.कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत.  तथापि, गैरअर्जदार याने त्याच्या म्हणण्याव्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

८.        अर्ज व अभिलेखावर उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता, खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात, त्यावर कारणांसह निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार हिने सिध्द केले आहे काय की, ती मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी म्हणून दरमहा रक्कम रु.१५,०००/– गैरअर्जदार क्र.१ कडुन मिळण्यास पात्र आहे ? असल्यास किती ? | अंशतः होय.<br><br>अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ कडुन दरमहा रु.३,०००/– प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. |
| २) | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ करीता –**

९.        अर्जदार हिने शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदार क्र.१ हा तिचा पती असुन गैरअर्जदार क्र.१ याने डिसेंबर २०२० मध्ये अर्जदार हिस अतोनात

मारहाण केली तसेच अर्जदार हिच्या चारित्र्यावर संशय घेवुन तिला मानसिक त्रास दिला. तद्नंतर, जानेवारी २०२१ मध्ये गैरअर्जदार याने अर्जदार हिच्या अंगावरील सर्व सोन्याचे व चांदीचे दागिने व कपडे घेवुन तिला माहेरी हाकलुन दिले. तेव्हापासुन अर्जदार ही तिच्या माहेरी रहात आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्यातील पती–पत्नीच्या नात्याबाबत कोणताही वाद नसल्याचे दिसते. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार ही माहेरी आल्यापासुन तिच्या ऊदरनिर्वाहाबाबत काही तरतुद केली किंवा कसे याबाबत काहीही कथन केले नाही. तसेच, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिच्या ऊदरनिर्वाहाची तरतुद केली असे दाखविणारा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदार हिचा पती असल्याने तिचा सांभाळ करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी त्याचेवरती आहे. वर नमुद बाबीचा विचार करता, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिच्या ऊदरनिर्वाहाची काहीएक तरतुद केली नसल्याचे दिसुन येते.

१०. गैरअर्जदाराचे कथन की, अर्जदार हिचे बी.सी.ए. इन कॉम्प्युटर ॲप्लीकेशन हे शिक्षण झाले असुन त्यावरती तिस नोकरी मिळु शकते. अर्जदार ही शिवणकाम व ब्युटी पार्लरचा व्यवसाय करीत असुन त्यापासुन तिला दरमहा २०,०००/– इतके उत्पन्न मिळते. अर्जदार हिच्या वडिलांची १० एकर बागायत शेती असुन त्यामध्ये अर्जदार मदत करते. त्यापासुन रक्कम रुपये ७,००,०००/– इतके वार्षिक उत्पन्न मिळते. प्रस्तुत प्रकरणी गैरअर्जदार क्र.१ याने वर नमुद कथनांबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे, गैरअर्जदार क्र.१ याच्या तोंडी कथनांवर विसंबुन राहणे योग्य होणार नाही. अशापरिस्थितीत, अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन असल्याचे

दिसत नाही. याऊलट, अर्जदाराचे कथन की, गैरअर्जदार यांचे कुटूंबियांकडे ४० एकर बागायत जमीन, ट्रॅक्टर, गाडी, प्रिमीयर, स्वीफट गाडी, चार मोटारसायकली, इ. वाहने आहेत. गैरअर्जदार क्र.१ हा रस्त्याची कामे घेणारा ठेकेदार आहे. गैरअर्जदार व त्यांचे कुटूंबिय दरसाल एक कोटी रुपये उत्पन्न मिळवितात. अर्जदार हिने अभिलेखावर गट क्र. १४९, २८ व ५७ चे ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केले आहेत. त्यामध्ये गैरअर्जदार क्र.१ याच्या नावे गट क्र.१४९ मध्ये ६० आर व शहाजी धुमाळ याचे नावे ०१ हे. १३ आर इतके क्षेत्र दिसुन येते. गट क्र.५७ व २८ मध्ये गैरअर्जदार क्र.१ याच्या नावे क्षेत्र दिसुन येत नाही. गैरअर्जदार क्र.१ हा रस्त्याची कामे घेतो व त्यास शेतीपासुन रक्कम रुपये एक कोटीचे उत्पन्न मिळते याबाबत अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

११. गैरअर्जदार क्र.१ याने त्याचे निशाणी ११ वरील म्हणण्यामध्ये कथन केले आहे की, त्यास शेतीशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. तसेच, त्याने त्याचे मालमत्ता, उत्पन्न व खर्च याबातचे शपथपत्र निशाणी क्र.१४ वर दाखल केले असुन त्यातील पान क्र.५ वरील अ.क्र.ड मध्ये त्याचे मासिक उत्पन्न ८,०००/– असल्याबाबत नमुद केले आहे. गैरअर्जदार क्र.१ याने सदरचे कथन शपथेवर केले आहे. अशा परिस्थितीमध्ये, गैरअर्जदार क्र.१ यास शेतीपासुन साधारणतः दरमहा रक्कम रु. ८,०००/– इतके उत्पन्न मिळते असे दिसुन येते. गैरअर्जदार याच्यावर अर्जदार हिच्या पालनपोषणाची तजवीज करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी होती व आहे, ती त्याने पार पाडल्याचे दिसून येत नाही. वर नमूद गोष्टींचा एकत्रीत विचार करता, गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिस दरमहा रक्कम

रु. ३,०००/– प्रमाणे अंतरिम पोटगी प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून, मूळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत देण्याचा आदेश होणे न्यायोचीत वाटते, म्हणून मुद्दा क्र. १ करीता, अंशतः होकारार्थी निष्कर्ष नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता –</u>**

१२. वर नमुद मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष विचारात घेता, अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर होण्यास पात्र आहे, म्हणून मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१) अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र.१ याने प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिस दरमहा रक्कम रु. ३,०००/– (रुपये तीन हजार फक्त) प्रमाणे अंतरिम पोटगी मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

३) सदर आदेशाची प्रत अर्जदार हिस विनामुल्य देण्यात यावी.

Digitally signed by PRAKASH LALASAHEB PATIL
Date: 2022.12.02 16:28:03 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

इंदापूर. ( पी. एल. पाटील )
दिनांक –०२.१२.२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.

**प्र मा ण प त्र**

'' मी, याद्वारे, असे प्रमाणित करतो की, प्रस्तुत पी.डी.एफ.फाईलच्या आदेशातील मजकुर हा तिच्या मुळ आदेशातील मजकुराच्या शब्दांनुसार समान आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | र. सि. पारवे,<br>लघुलेखक निम्नश्रेणी –३. |
| न्यायालयाचे नांव व पदनाम | – | पी.एल.पाटील,<br>न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| आदेशाची तारीख | – | ०२/१२/२०२२. |
| आदेश न्यायिक अधिकारी यांनी स्वाक्षरित केल्याची तारीख | – | ०२/१२/२०२२. |
| आदेश सी.आय.एस.प्रणाली मध्ये अपलोड केल्याची तारीख | – | ०३/१२/२०२२. |